# व्हिसल ब्लोवर योजना

## १. प्रस्तावना :

ईट्स कॅश कार्ड लिमिटेड, जी ह्या नंतर आय.सी.सी.एल म्हणून ओळखली जाईल, ही तिच्या व्यवहारात उच्च नैतिक दर्जा आणि नैतिक सचोटी, पारदर्शकता आणि योग्यतेसाठी कटिबद्ध आहे. आय.सी.सी.एल. उच्च दर्जाची व्यावसायिकता, प्रामाणिकपणा, सचोटी आणि नैतिक वागणुकीचा अंगिकार करून तिचे मूलभूत व्यवहारिक आचरण एका योग्य आणि पारदर्शक पद्धतीने करण्यावर विश्वास ठेवते. आय.सी.सी.एल तिची नियमावली (“द कोड” ) पध्दतशीर रितीने प्रतिपादन करत आलेली आहे, जी आपली तत्वं आणि दर्जा तसेच कंपनी आणि तिच्या कर्मचा-यांच्या कृतींना शासित करू शकते. कोणतीही उल्लंघन/संभाव्य उल्लंघनांची वर्तणूक निदर्शीत करण्यात व्हिसल ब्लोवर ची भूमिका चुकीची समजली जाऊ शकणार नाही

**“आय.सी.सी.एलच्या प्रत्येक कर्मचा-याने त्याच्या लक्षात आलेली कुठलीही उल्लंघनाची किंवा संभाव्य उल्लंघनाची घटना, जी कंपनीच्या व्यापारावर किंवा प्रतिष्ठेवर विपरीत परिणाम करत असेल, त्वरित कंपनीच्या निदर्शनास आणून द्यावी.”**

## २. उद्दिष्ट आणि वाव :

ही योजना व्हिसल ब्लोवरला नैतिक मूल्ये,सचोटी किंवा आय.सी.सी.एलच्या नियमावलीचे उल्लंघन करणे अशा गंभीर मुद्यांवर लक्ष देण्यासाठी मार्गदर्शन करते.

## ३. व्याख्या आणि स्पष्टीकरणे :

व्याख्या :

योजनेत वापरलेल्या काही महत्वाच्या गोष्टींच्या व्याख्या पुढे दिलेल्या आहेतः

अ. "हिशेब तपासणी समिती" म्हणजे १९५६ च्या कंपनी कायद्याच्या कलम २९२ अनुसार कंपनीच्या संचालक मंडळाने स्थापित केलेली हिशेब तपासणी समिति, आणि ही, जेंव्हा लागू होईल तेंव्हा, शेअर बाजारासोबतच्या लिस्टीग कराराच्या कलम ४९ सोबत वाचावी.

आ. "कोड" म्हणजे आय.सी.सी.एलची चालू असलेली नियमावली.

इ. "कर्मचारी" म्हणजे कंपनीचा प्रत्येक कर्मचारी (भारतात किंवा परदेशात काम करणारे व माजी कर्मचा-यांसाहित)

ई. "चौकशी अधिकारी" म्हणजे चौकशी करणारा/करणा-या अशा व्यक्ती आहेत ज्यांना हिशेब तपासणी समितीने अधिकार सोपवला आहे किंवा ज्यांची नेमणूक केली आहे किंवा ज्यांचा सुरक्षित प्रकटीकरणांच्या चौकशीमध्ये सल्ला घेतला आहे जे आय.सी.सी.एलचे कर्मचारी असू किंवा नसू शकतात.

उ. "सुरक्षित प्रकटीकरण" म्हणजे व्हिसल ब्लोवरने विश्वासाने साधलेला असा संवाद जो अनैतिक किंवा अयोग्य कृतींचा पुरावा उघडकीस आणतो.

ऊ. "संबंधित" म्हणजे अशी व्यक्ती ज्याच्या विरूद्ध किंवा ज्याच्या संबंधी सुरक्षित प्रकटीकरण बनवले गेले आहे किंवा चौकशी दरम्यान पुरावा गोळा केला आहे.

ऋ. "व्हिसल ब्लोवर" म्हणजे सध्याचा किंवा माजी कर्मचारी, गि-हाईक, विक्रेते किंवा संस्थेचा, विशेषतः एका व्यावसायिक अथवा सरकारी संस्थेचा सभासद, जो गैरवर्तणूकीबद्दल अधिकारी मंडळींना- ज्यांना योग्य कृती करण्याची इच्छा आहे- त्यांना सांगतो. गैरवर्तणूक म्हणजे कायद्याचे, नियमांचे उल्लंघन करणे आणि/किंवा सरळ सरळ जनहिताला धोका असलेल्या गोष्टी, जसे की घोटाळा, स्वास्थ्य/सुरक्षेचे उल्लंघन, अधिकाराचा दुरूपयोग करणे आणि भ्रष्टाचार.

<u>स्पष्टीकरणे</u>

ह्या योजनेत, जो पर्यंत विसंगती दिसून येत नाही :

अ. एक अंतर्गत अनेक किंवा ह्या उलट

आ. पुलिंगी, स्त्रीलिंगी, किंवा नपुसकलिंगी दर्शवणारा कोणताही शब्द किंवा उद्गारांचा तिन्ही लिंगांमध्ये समावेश केला जाईल.

## ४. कार्यपद्धती :

अ. सर्व सुरक्षित प्रकटीकरणे कंपनीच्या हिशेब तपासणी समितीच्या मुख्याधिका-याच्या नावे असली पाहिजेत. सध्याच्या हिशेब तपासणी समितीच्या मुख्याधिका-यांचा संपर्क खालील प्रमाणे आहे:

श्री.एम.एम.चितळे, हिशेब तपासणी समितीचे अध्यक्ष
ईट्स कॅश कार्ड लिमिटेड.
६ वा मजला,एवरेस्ट स्क्वेअर, श्रद्धानंद रोड
विले पार्ले(पूर्व), मुंबई ४०० ०५७
इ-मेल चा पत्ता: mmc@mmchitale.com

आ. उद्भवलेले प्रश्न समजण्यासाठी सर्व सुरक्षित प्रकटीकरणे ही शक्यतो लेखी स्वरूपात असावित आणि शक्यतो इंग्रजीत किंवा व्हिसल ब्लोवरच्या भागातील

प्रादेशिक भाषेत लिहिलेली किंवा टंकलिखित केलेली असावित. सुरक्षित प्रकटीकरणे एका बंद पत्राद्वारे पाठवली गेली पाहिजेत, ज्यावर शक्यतो व्हिसल ब्लोवरची ओळख असेल. हिशेब तपासणी समितीचे मुख्याधिकारी स्वतंत्रपणे स्वतःच्या अधिकाराखाली चौकशी करू शकतात किंवा निनावी प्रकटीकरणांवर स्वतंत्रपणे चौकशी करू शकतात.

इ. हिशेब तपासणी समितीचे मुख्याधिकारी ते पत्रक उघडून त्यातील सुरक्षित प्रकटीकरणांची चर्चा तपासणी समितीच्या सभासदांसोबत करू शकतात आणि दखलपात्र ठरल्यास सुरक्षित प्रकटीकरण चौकशी करणा-या अधिका-याकडे देऊ शकतात.

ई. सुरक्षित प्रकटीकरणे निंदाजनक अथवा निर्णायक स्वरूपाचे नसून घटनाप्रधान असावीत आणि त्यात शक्यतो नेमकी माहिती असावी जेणेकरून त्याच्या प्राथमिक चौकशीत त्याची मदत होईल.

## ५. चौकशी :

अ. ह्या योजनाअंतर्गत नमूद केलेल्या सर्व सुरक्षित प्रकटीकरणांची चौकशी अधिका-यांकडून चौकशी केली जाईल.

आ. चौकशी अधिका-यासंबंधी असलेली सर्व सुरक्षित प्रकटीकरणे, जी हिशेब तपासणी समितीच्या मते चौकशी करताना चौकशी अधिका-यांच्या स्वातंत्र्यामध्ये अथवा तपासप्रक्रियेमध्ये बाधा आणू शकतात, गरज पडल्यास त्यांची चौकशी हिशेब तपासणी समिती स्वतः करू शकते.

इ. संबंधित व्यक्तीची ओळख कायदेशीर गरजा आणि चौकशीच्या प्रमाणानुसार गुप्त ठेवली जाईल.

ई. औपचारिक चौकशी दरम्यान निघालेले निष्कर्ष संबंधित व्यक्तीला कळवले जातील आणि त्याला चौकशी दरम्यान स्वतःची बाजू मांडण्याची संधी दिली जाईल.

उ. चौकशी दरम्यान चौकशी अधिका-याला / हिशेब तपासणी समितीला पूर्ण सहकार्य करणे हे त्या संबंधित व्यक्तीचे / व्यक्तींचे कर्तव्य असेल. अर्थात, सहकार्य म्हणजे फक्त दोष स्वीकारणे नव्हे.

ऊ. बंधित व्यक्तीला / व्यक्तींना चौकशी अधिकारी, हिशेब तपासणी समितीच्या आणि / किंवा व्हिसल ब्लोवरच्या सभासदांव्यतिरीक्त, त्यांच्या इच्छेप्रमाणे, इतर कोणत्याही

व्यक्तीचा/व्यक्तींचा सल्ला घेण्याचा हक्क आहे. त्या व्यक्तीला चौकशीच्या दरम्यान स्वत:च्या खर्चाने स्वत:चा प्रतिनिधी नेमण्याचे स्वातंत्र्य राहील.

ए. संबंधित व्यक्तीवर चौकशीमध्ये दखल न देण्याची जबाबदारी आहे. संबंधित व्यक्तीकडून पुरावा लपवला जाणे, नष्ट केला जाणे किंवा त्यात फेरबदल करणे आणि साक्षीदाराला प्रोत्साहित करणे, शिकवणे, धमकावणे किंवा भीती दाखवणे यासारखे प्रकार होता नयेत.

ऐ. जोपर्यंत आक्षेपार्ह कारणे आढळत नाहीत तोपर्यंत चौकशीच्या अहवालात असलेल्या शोधांवर मत मांडण्याची त्या व्यक्तीला संधी दिली जाईल. जोपर्यंत केलेल्या विधानांना आधार म्हणून पुरेसा आणि योग्य पुरावा नसेल तो पर्यंत त्या व्यक्तीच्या विरोधात केलेले आरोप मान्य केले जाणार नाहीत.

ओ. संबंधित व्यक्तीला / व्यक्तींना चौकशी दरम्यान निघालेल्या निष्कर्षाबाबत माहिती असण्याचा अधिकार आहे. जर आरोपांची पुष्टी झाली नाही तर संबंधित व्यक्तीला/व्यक्तींना चौकशीच्या निकालातील सार्वजनिक प्रकटीकरण त्याच्या आणि कंपनीच्या हितासाठी आहे की नाही ह्या संदर्भात विचारले जाईल.

औ. सुरक्षित प्रकटीकरण मिळाल्यानंतर ४५ ते ९० दिवसांच्या आत सर्वसाधारण चौकशी पूर्ण झाली पाहिजे.

**६. अहवाल :**

चौकशी अधिकारी गेल्या अहवालापासून, झालेल्या चौकशीसहित - झाली असल्यास - त्याच्याकडे / तिच्याकडे सोपवलेल्या सर्व सुरक्षित प्रकटीकरणांचा एक अहवाल नियमितपणे हिशेब तपासणी समितीकडे सोपवेल / सोपवतील, ज्यात, झाल्या असल्यास, प्राथमिक चौकशीचा समावेश असेल.

**७. निर्णयः**

जर एखाद्या चौकशीअंती, संभाव्य प्राथमिक अहवालासहित, हिशेब तपासणी समितीला असे आढळून आले की अयोग्य किंवा अनैतिक कृत्य घडले आहे, तर समिती कंपनीच्या व्यवस्थापनाला समितीस योग्य वाटेल ती शिस्तभंगाची किंवा सुधारणेची कारवाई करण्यास सांगू शकते.

**८. संरक्षण/अपात्रताः**

अ. निष्ठावान व्हिसल ब्लोवर्सना व्यवस्थापनाकडून कोणत्याही प्रकारची अयोग्य वागणूक मिळण्यापासून संपूर्ण संरक्षण दिले जाईल.

व्हिसल ब्लोवरची ओळख शक्यतो आणि संमत कायद्याअंतर्गत गोपनीय ठेवली जाईल. व्हिसल ब्लोवर्सना सूचना दिली जात आहे की त्यांची ओळख चौकशी अधिका-यांच्या/हिशेब तपासणी समितीच्या नियंत्रणाबाहेरील काही कारणामुळे उघडकीस येऊ शकते. (उदा. चौकशी अधिका-यांकडून चौकशी चालू असताना)

इतर कोणताही कर्मचारी सांगितलेल्या चौकशीत मदत करत असेल तर त्याला देखिल व्हिसल ब्लोवर प्रमाणेच संरक्षण देण्यात येईल.

आ. अर्थात, ह्या योजनेअंतर्गत सुरक्षेचा अर्थ असा नव्हे की, ह्या योजनेअंतर्गत कुणी कुणावर चुकीचे आरोप केले तरीही त्याला शिस्तभंगाच्या कारवाईला सामोरे जावे लागणार नाही, खास करून तेंव्हा, जेंव्हा असे आरोप हेतुपुरस्सर आणि वाईट हेतुने केले जातील. कुणीही व्हिसल ब्लोवर अशा प्रकारचे कुठलेही दुष्हेतुप्रेरित/ निष्काळजीपणे केलेले/निराधार/अपायकारक सुरक्षित प्रकटीकरण करताना तीन वेळा आढळल्यास तो ह्या योजनेअंतर्गत पुन्हा कुठलेही सुरक्षित प्रकटीकरण करण्यास अपात्र ठरविला जाईल. अशा व्हिसल ब्लोवर्सविरुध्द हिशेब तपासणी समितीने तिला योग्य वाटलेली आणि सुचवलेली शिस्तभंगाची कारवाई करण्याचा अधिकार कंपनीकडे राखीव असेल.

**९. दस्त-ऐवज राखून ठेवणे:**

सर्व लेखी किंवा चौकशीच्या निर्णयासहित असलेले सुरक्षित प्रकटीकरण कंपनी दस्तऐवजाच्या स्वरूपात कमीतकमी सात वर्षांपर्यंत राखून ठेवेल.

**१०. सुधारणा :**

कोणतीही पूर्व सूचना व कोणतेही कारण न देता ह्या योजनेमधे संचालक मंडळाच्या संमतीने संपूर्णपणे किंवा अंशत: सुधारणा करण्याचा अधिकार कंपनी राखून ठेवते.

**मुंबई**

**दिनांक: १ एप्रिल, २००९**

--------

(स्वाक्षरी)